REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २५ आक्टोबर, १९४४ अंक ४२

धी
## बॉम्बे को-ऑपरेटिव
## इन्शुअरन्स सोसायटी लि.

| | | |
|---|---|---|
| नवीन काम ( १९४३ ) | रु. | ३९,२७,६१९ |
| एकंदर चालू विमे | रु. | १,६१,९०,५४१ |
| जीवन विमा निधि | रु. | २२,१५,९७४ |
| कुल उत्पन्न | रु. | १०,३३,००० |

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. (कँटब.)

महाराष्ट्र-कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :
श्री. कुळकर्णी आणि कं.

मुख्य कचेरी :
को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानची आघाडीवरील
सहकारी संस्था

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
### पुणें शहर

भांडवल :
( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, खडकी, दलाल स्ट्रीट, ( मुंबई ), गिरगांव (मुंबई), जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*
### पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

### जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार वांगड्या कि. आठ रु. गरजेप्रमाणें दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

गिरगांव मुंबई नं. ४
## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### डालमिया सिमेंट लि.

वरील कंपनीस १९४३ अखेरच्या वर्षी १४,३३,२३४ रुपये निव्वळ तोटा आला आहे! १९४३ सालीं कंपनीचा सर्व तयार माल सरकारच्या नियंत्रणासाठीं होता. विक्रीची किंमत ठराविक होती परंतु उत्पादनखर्च मात्र वाढला, त्याचा हा परिणाम आहे. ह्या संबंधांतील तूट भरून मिळेल, असें सप्लाय खात्यानें आश्वासन दिलें, त्याप्रमाणें सरकारनें कंपनीला १४ लक्ष रुपये दिले. कंपनीनें लागलीच १९४४ सालासाठीं ॲड इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें. शेअरचा भाव १५ रु. ४ आ. चा १० रु. ८ आणे झाला.

### साखरेचें उत्पादन अपेक्षेपेक्षां कमी

सप्टेंबर, १९४४ अखेर १९४३–४४ च्या मोसमांत हिंदी साखर कारखान्यांत १२,२१,१९२ टन साखर तयार झाली. मोसम ऑक्टोबर अखेर संपतो, तोंपर्यंत उत्पादनाचा आंकडा १२ लक्ष, २१½ हजार टनावर जाईल असें दिसत नाहीं. ह्या मोसमांत साखरेचें उत्पादन उच्चांक गाठील अशी अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरली आहे. १९३९–४० मधील उत्पादनाचा आंकडा १२,४१,७०० टन होता.

### चांदी विकण्यास प्रारंभ

रिझर्व्ह बँकेनें १२५ रुपयांस १०० तोळे ह्या दरानें चांदी विकण्यास गेल्या आठवड्यांत प्रारंभ केला आहे. ह्याचा अर्थ, चांदीचा कमाल भाव आतां १२५ रुपये ठरला, असें समजावयाचें आहे.

### के. अमृतलाल ओझा

कोळसा खाणींचे एक प्रमुख मालक श्री. अमृतलाल ओझा हे नुकतेच मरण पावले.

### बियांसाठीं हिंदुस्थान सरकार कर्ज व देणगी देणार

हिंदुस्थानानें भाजीपाल्याच्या बियांच्या आयातीवर अवलंबून राहूं नये, ह्याकरितां देशांतच युरोपिअन जातींच्या भाजीपाल्याचें बीं तयार करण्यासाठीं हिंदुस्थान सरकार प्रांतिक सरकारांना १ कोटि ५६ लक्ष रुपयांचें कर्ज व ५० लक्ष रुपये देणगी देणार आहे. ४,५१,००० पौंड बीं तयार व्हावें, अशी अपेक्षा आहे.

### दुकानाच्या पाटीचीं अक्षरें ६ इंचांपेक्षा मोठीं नकोत

दुकानांच्या पाट्यांवरील ग्रेट ब्रिटनमध्यें निर्बंध आतां थोडे सैल करण्यांत आले आहेत. कमी उंचीवरून जाणाऱ्या विमानास दुकानाची पाटी वाचतां येता कामा नये एवढाच निर्बंध आतां शिल्लक आहे. ह्या नियमाचा साधारण अर्थ असा, कीं पाटीचीं अक्षरें ६ इंचांपेक्षा मोठीं असूं नयेत.

### हॉब्लन–नॉर्मन फंड

बँक ऑफ इंग्लंडच्या स्थापनेस २५० वर्षें पूर्ण झालीं, त्यानिमित्त बँकेच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं आर्थिक संशोधनासाठीं एक लक्ष रुपायांचा ट्रस्ट निर्मान करण्याचें ठरविलें आहे. बँकेचे १६९४ मधील पहिले गव्हर्नर सर जॉन हॉब्लन व २४ वर्षें गव्हर्नर म्हणून काम करून नुकतेच सेवानिवृत्त झालेले मि. मॉंटेग्यू नॉर्मन ह्या दोघांचे नांवानें स्मारक म्हणून त्या फंडास "हॉब्लन–नॉर्मन फंड" असें संबोधण्यांत येईल.





व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२३,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतींच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३४६ |
| २ बॉंबे को. बँक्स असोसिएशन | ३४७ |
| ३ युद्धोत्तर काळांत मोटारींचें उत्पादन | ३४७ |
| ४ अर्बन सहकारी बँकांपुढचे प्रश्न | ३४८ |
| ५ नगर सें. को. बँक | ३४८ |
| ६ संस्थानिकांच्या नानेवाइकावर कर | ३४८ |
| ७ स्फुट विचार | ३४९ |
| मुंबई प्रांतिक सहकारी परिषद्–सहकारी नाट्यसंघ—"पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी"—के. गुरुनाथराव ओगले. | |
| ८ भिवंडी ता.को.सु.यूनियन | ३५० |
| ९ दुधाचें रेशानिंग | ३५० |
| १० पुणें जि. खरेदी-विक्री संघ | ३५० |
| ११ दांडेकर मशीन वर्क्स | ३५० |
| १२ रोख पैशाची सुरक्षितता | ३५१ |
| १३ सहकारी खरेदी–विक्रीचें महत्त्व | ३५१ |
| १४ पुणें सहकार सप्ताह | ३५२ |

अर्थ

बुधवार, ता. २५ आक्टोबर, १९४४

## बॉंबे को. बँक्स असोसिएशन

### गेल्या वर्षांतील कामगिरी

बॉंबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनचा ३० जून, १९४४ अखेरचा पांचवा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या संस्थेच्या उपयुक्त कार्याची चांगली कल्पना येते. अहवालाचे वर्षी सहा बँका संस्थेच्या नव्यानें सभासद झाल्या, म्हणजे आतां १२ सेंट्रल बँका, १ बँकिंग यूनियन व ३६ अर्बन बँका असोसिएशनच्या पटावर आहेत. ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट आतां प्रांतांतील बऱ्याच तालुक्यांत लागू होत असल्याकारणानें त्यांचा मध्यवर्ती बँकांच्या व्यवहारावर काय परिणाम होईल, ह्याची बारकाईनें पहाणी करणें आवश्यक झालें, आणि बदललेल्या परिस्थितींत मध्यवर्ती बँकांनीं शेतकऱ्यांस नवीं कर्जें कोणत्या अटींवर द्यावीं व बँकांना सरकारकडून कोणत्या सवलती मिळाव्या लागतील ह्याविषयीं असोसिएशननें चर्चा करून सरकार व सभासद बँका ह्या दोघांसहि मार्गदर्शन केलें. असोसिएशननें तिच्या घटनेंतील २ ( ५ ) ह्या नियमास अनुसरून अद्याप सभासद बँकांच्या तपासणीचें काम सुरू केलेलें नाहीं, ह्याकडे रजिस्ट्रारनें आपल्या १९४१-४२ च्या वार्षिक रिपोर्टांत लक्ष वेधलें होतें. असोसिएशननें कोणत्या बँकांची कोणत्या परिस्थितींत तपासणी करावयाची, हें कार्यकारी समितीनें आतां ठरविलें आहे. एकापेक्षां अधिक क्रेडिट सोसायट्यांचें सभासदत्व ज्यांनीं ४५वा नियम होण्याचे अगोदर मिळविलेलें आहे, अशांचें सभासदत्व ह्यापुढेंहि चालू रहाण्यास प्रत्यवाय नसावा; फक्त एक सोडून बाकीच्या सोसायट्यांत बिगर-कर्जदार सभासद म्हणून त्यांचें नांव नोंदलें जावें आणि कर्जांचे व्याख्येंत मुदती ठेवी, सरकारी रोखे, जंगम माल, इत्यादींचें तारणावरील कर्जांचा समावेश होऊं नये अशा अर्थाचें सर्क्युलर रजिस्ट्रारनीं काढण्याचें योजिलें असल्यानें ४५ च्या नियमाचे अंमलबजावणीबाबत अडचणी उरणार नाहींत, अशी अपेक्षा आहे. अर्बन बँकांच्या व्यवहाराचे वाढीस वाव मिळावा ह्या दृष्टीनें असोसिएशननें रजिस्ट्रारशीं चर्चा केली, तीस अनुसरून सर्क्युलरें निघालीं आहेत. अर्बन बँकांसाठीं सुपरवाइझिंग यूनियन्स स्थापन करण्यांत याव्यीं, ही रजिस्ट्रारची सूचना बहुसंख्य सभासद बँकांस पसंत पडली नाहीं.

सहकारी बँकांनीं आपल्या ठेवींवरील व्याजाचे दर उतरविले तरी त्यांना ८ व्या नियमाचें बंधन संभाळणें कठीण झालें. ह्या नियमांत सुधारणा व्हावी ह्याबद्दल असोसिएशननें निकडीचे प्रयत्न केले. आतां सरकारनें नियमांतील अट सौम्य करून भाग भांडवल, रिझर्व्ह फंड व बिल्डिंग फंड ह्यांतून साठलेला तोटा उणें करून येणाऱ्या रकमेच्या बारा पटींचे आंत बँकांच्या ठेवींची रकम पाहिजे, असें ठरविलें आहे. मात्र, सरकारनें त्यांची गुंतवणूक, व्याजाचा दर, इत्यादि संबंधांत बंधनें घातलीं आहेत. शेतीच्या मालाचे किंमतीमधील वाढीचा सोसायट्यांच्या सभासदांचे कर्जांच्या व्यवहारावर काय परिणाम झाला आहे, ह्याविषयीं असोसिएशननें तपशीलवार माहिती मागविली, ती संकलित करून तिचा गोषवारा रिपोर्टांत देण्यांत आलेला आहे. बँकांकडून त्यांचेकडील ठेवी, तरते पैसे, तरत्या पैशाचें एकूण देण्यांशीं प्रमाण व कर्जें इत्यादि संबंधी तपशीलवार माहिती असोसिएशननें मागवून तक्ते तयार केले आहेत. त्यांपासून बोधप्रद निष्कर्ष निघेल अशी अपेक्षा आहे. युद्धजन्य आर्थिक परिस्थितीचा सोसायट्यांचे सभासदांवर काय परिणाम झाला ह्याची पहाणी करण्याचें, असोसिएशनच्या विनंतीवरून सहकारी इन्स्टिट्यूटनें मान्य केलें आहे. असोसिएशन त्यासाठी इन्स्टिट्यूटला ५०० रुपये ग्रॅन्ट देणार आहे.

असोसिएशननें केलेल्या कामगिरीचा अगदीं ओझरता उल्लेख येथें करण्यांत आला आहे, परंतु त्यावरूनहि ही संस्था सहकारी बँकिंगची उपयुक्तता वाढविण्याचे दृष्टीनें कसें कार्य करीत आहे ह्याची कल्पना येईल. असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी, प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांच्याकडेच ह्या कार्याचें श्रेय मुख्यत: जातें, हें उघड आहे. सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारशी सलोख्याचे संबंध राखून, असोसिएशनची प्रतिष्ठा वाढवून, तिच्या मतास महत्त्व प्राप्त करून देण्याचें काम त्यांनीं गेल्या पांच वर्षांत यशस्वी रीतीनें केलें आहे. रजिस्ट्रारनींहि, महत्त्वाच्या मुद्यांवर असोसिएशनशी चर्चा करण्याची प्रथा ठेवली आहे, त्यामुळेंच असोसिएशनचें कार्य प्रभावी होत आहे.

### युद्धोत्तर काळांत मोटारींचें उत्पादन

अमेरिकेंत मोटारींचें उत्पादन बंद असून मोटारींच्या कारखान्यांत युद्धसाहित्याची निर्मिति चालू आहे. तथापि, कारखान्यांतील कांहीं भाग मोटारींच्या युद्धोत्तर उत्पादनाची आखणी करण्यासाठी राखून ठेवण्यांत आलेला असतो व त्यांत तज्ज्ञ इंजिनिअर आपलें डोकें चालवीत असतात. १९३९ सालानंतर आतां यांत्रिक सुधारणा इतक्या झाल्या आहेत, कीं त्यांचा फायदा होऊन मोटारी बनवावयाच्या म्हटल्या म्हणजे रचना अगदीं नव्या पद्धतीनें करावी लागेल, आणि आखणी व प्रत्यक्ष उत्पादन यांचेमध्यें बराच काळ लोटावा लागेल. म्हणून अमेरिकेंत युद्धसमाप्तीनंतर १९४२ च्या मॉडेलच्याच मोटारी प्रथम काढण्यांत येतील. त्या मोटारींचीं दारें व खिडक्या बटनें दाबून उघडतां लावतां येतात व गिअर बदलण्याच्या पद्धतींतहि सुधारणा केलेली आहे. कोणतीहि ब्रिटिश मोटार ह्या अमेरिकन मोटारींशी तात्काळ स्पर्धा करून टिकूं शकणार नाहीं. ब्रिटिश मोटार कारखानदारांस ह्या संबंधांत काळजी वाटत आहे.

## अर्बन सहकारी बँकांपुढचे प्रश्न

### प्रो. काळे ह्यांनीं कोल्हापूर येथें केलेली चर्चा

कोल्हापूर नगरपालिकेस नव्वद वर्षे पुरीं झालीं आणि तिला बरो म्युनिसिपालिटीचा उच्च दर्जा प्राप्त झाला ह्या निमित्तानें आणि तिनें हातीं घेतलेल्या सुधारणांच्या योजनांचे प्रसंगानें सप्ताह साजरा करण्यांत आला. त्यावेळीं श्री. नाईक ह्यांनीं लिहिलेल्या नगरपालिकेच्या इतिहासाचें प्रकाशन प्रो. काळे यांच्या हस्तें समारंभपूर्वक गेल्या १२ तारखेस झालें. ह्या सप्ताहांत युद्धोत्तर जागतिक चलनव्यवस्था ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांचें जाहीर व्याख्यानहि झालें. त्यांच्या कोल्हापुरांतील वास्तव्याचा फायदा घेऊन स्थानिक श्रीमहालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चालकांनीं सहकारी बँकांच्या पुढें असलेल्या अडचणींच्या प्रश्नांची चर्चा घडवून आणली. त्याप्रसंगीं सुमारें शंभर कार्यकर्ते उपस्थित होते.

कोल्हापुरांतील बहुतेक सर्व सहकारी बँकांशीं संबंध असलेल्या मंडळींचा त्यांत भरणा होता. प्रो. काळे ह्यांनीं सहकारी बँकांची परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे आणि युद्धोत्तर काळांत त्यांस कोणत्या अडचणींशी झगडावें लागेल ह्याविषयीं प्रथम विवेचन केलें. सहकारी बँकांचें उद्दिष्ट सामान्य स्थितींतील लोकांस बचतीची सवय लागून व्यापार-उद्योगधंद्यांसाठीं व घरगुती कामासाठीं भांडवल पुरवणें आणि त्यांस स्वार्थत्यागपूर्वक परस्पर सहायाची सवय लावणें हें आहे आणि त्या व इतर बँका ह्यांचेमध्यें महत्त्वाचा तात्त्विक भेद आहे, ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली. व्यवहारदृष्टीनें दोन्ही वर्गांतील बँकांचा हिशेबीपणा चोख असला पाहिजे असें त्यांनीं बजावलें. पुढें चलन कमी होऊन बाजारभाव उतरतील आणि ठेवींस ओहोटी लागेल, त्या घटनेस तोंड देण्याची तयारी रिझर्व्ह व रोख्यांतील गुंतवण मजबूत राखून बँकांनीं एव्हांपासून ठेवावी असें त्यांनीं सुचविलें. व्यापार व उद्योगधंदे ह्यांस अल्प मुदतीचा भांडवल-पुरवठा बँकांनीं कसा करावा आणि पैसा अडीअडचणींसाठीं कसा तरता ठेवावा ह्याची माहिती त्यांनीं सांगितली. बँकांच्या कार्यकर्त्यांनीं वेळोवेळ एकत्र येऊन स्वतःच्या हितसंबंधी प्रश्नांची चर्चा करावी आणि जुटीनें वागावें असा सल्ला अखेर त्यांनीं दिला.

स्थानिक परिस्थितीस अनुलक्षून कोल्हापुरांतील सहकारी बँकांस भासत असलेल्या अडचणींविषयींचे अनेक प्रश्न पाहुण्यांस विचारण्यांत आले आणि त्यांनीं त्यांचीं सविस्तर उत्तरें दिलीं:—

"बँकांनीं वाटावयाच्या डिव्हिडंडवर रजिस्ट्रारकडून घालण्यांत येणारें नियंत्रण अनिष्ट नसून आवश्यक असतें. अर्बन बँकांनीं आपल्या शिलकी पैशाची ठेव सेंट्रल बँकेकडे ठेवून सहकारी पैसा सहकारी चळवळींमध्यें ठेवणें उचित आहे. बँकांनीं सरकारी रोख्यांत गुंतवलेला पैसा त्यांस अडचणीचे प्रसंगीं उपयोगी पडतो. अल्प मुदतीच्या कर्ज—रोख्यांच्या किंमती विशेष उतरण्याचा संभव नाहीं. ठेवींत झालेल्या वाढीचे दृष्टीनें बँकांच्या वसूल झालेल्या भांडवलांत वाढ केली जाणें आवश्यक आहे. बँकांनीं एकमेकांकडे ठेवी ठेवून सर्वांचें खेळतें भांडवल वाढल्याचा भास उत्पन्न करण्यांत हशील नाहीं. अर्बन बँकांस सेंट्रल बँकेच्या डायरेक्टरांचे बोर्डावर प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे." ह्या उत्तरांवरून प्रो. काळे ह्यांस विचारलेले प्रश्न आणि त्यांविषयींचा त्यांनीं केलेला खुलासा ह्यांची कल्पना येण्यासारखी आहे.

वरील चर्चेनंतर श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कचेरींत त्या संस्थेच्या चालकांनीं प्रो. काळे ह्यांस उपहार देऊन त्यांचा सन्मान केला. तेथेंहि बरेच निमंत्रित सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## नगर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### भिंगार येथील शाखेचें उद्घाटन

वरील बँकेची शाखा भिंगार येथें बालिप्रतिपदेच्या मुहूर्तावर (ता. १८।१०।४४) रोजीं सकाळीं १०॥ वाजतां आमदार भाऊसाहेब फिरोदिया यांचे हस्तें उघडण्यांत आली. उद्घाटन समारंभास सुमारें ५०० सद्गृहस्थ आले होते. ईशस्तवन व स्वागतपर पद्य झाल्यावर बँकेचे चेअरमन श्री. मोतीलाल फिरोदिया बी. ए. यांचें प्रास्ताविक भाषण झालें. त्यांत त्यांनीं १९१० सालीं बँकेची स्थापना झाल्यापासून कशी प्रगति होत गेली तें दर्शवून आतां बँकेची स्थिति कशी भक्कम आहे हें आंकड्यांनिशी सांगितलें. बँकेची संगमनेर येथें शाखा १९४३ सालीं उघडलेली असून, आतां ही दुसरी शाखा उघडत आहे. नगरच्या ऑफिसांत आतां स्त्री-विभाग निघणार आहे. बँकेची स्थापना शेतकऱ्यांशीं व्यवहार करण्यासाठीं झाली पण मध्यंतरीं तो व्यवहार बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल बँकेकडे गेला; तो परत बँकेनें आपणाकडे घेण्याचा विचार केला असून त्याबाबत पत्रव्यवहार चालू झाला आहे. नंतर त्यांनीं भिंगारचे जनतेचे सोयींसाठींच शाखा निघत आहे, तरी सर्वांनीं सहकार्य करावें असें सांगून अध्यक्षास शाखा उद्घाटन करणेस विनंती केली. अध्यक्षांनीं शाखेचें उद्घाटन झाल्याचें जाहीर करून थोडक्यांत भाषण केलें. बँकेनें शेतकऱ्यांशीं परत व्यवहार करण्याचें ठरवलें हें स्तुत्य आहे. परंतु परत मंदी येईल असें गृहीत धरून काळजीपूर्वक पाऊल टाकावें असा इशारा दिला. तसेंच बँकेचे नोकरवर्गांनींहि सेवावृत्तीनें काम केलें पाहिजे असें सांगितलें. व शेवटीं उद्घाटन करण्याची संधि दिली याबद्दल आभार मानून आपलें भाषण संपविलें. चेअरमन यांनीं अध्यक्षांचे आभार मानून त्यांना पुष्पहार अर्पण केला. नंतर भिंगार येथील खा. ब. नगरवाला, खा. सा. दिनशा इराणी, रा. सा. हरि किसनजी, श्री. डेरे, मिश्रीलालजी व मुनशी अजगर अली यांचीं भाषणें झालीं. या सर्वांनीं आपल्या भाषणांत बँकेची शाखा भिंगार येथें निघत आहे व त्यामुळे भिंगारचे जनतेची फार गैरसोय दूर होत आहे याबद्दल आनंद व्यक्त केला व नफेबाजीपेक्षा जनतेच्या सोयीकडे ही बँक फार लक्ष देत असते असें प्रतिपादन केलें. नंतर मॅनेजर श्री. निसळ यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर वंदेमातरम् व पानसुपारी झाल्यावर समारंभ समाप्त झाला.

---

## संस्थानाकडून संस्थानिकाच्या नातेवाईकांस मिळणाऱ्या रकमेवर इनकम टॅक्स

मिरजेच्या राजेसाहेबांचे बंधु श्री. हरिहरराव गंगाधरराव पटवर्धन ह्यांस राजेसाहेबांकडून सालिना १२००० रुपये अलावन्स मिळतो, त्यावर इनकम टॅक्स अधिकाऱ्यांनीं इनकम टॅक्स बसविला. अविभक्त हिंदु कुटुंबातील एका घटकास कुटुंबाकडून मिळालेल्या रकमेवर कायद्याच्या १४ (१) कलमाप्रमाणें कर बसवितां येत नाहीं, असा मुद्दा श्री. हरिहरराव ह्यांनीं उपस्थित केला. मिरज संस्थान ही वंशपरंपरा येणारी अविभाज्य इस्टेट मानतां येत नाहीं व संस्थानचें उत्पन्न हें अविभक्त कुटुंबाचें उत्पन्न होत नाहीं, असें इनकम टॅक्स अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें. मुंबई हायकोर्टाकडे हें प्रकरण गेलें, तेव्हां, "श्री. हरिहरराव ह्यांचा अलावन्स संस्थानच्या उत्पन्नांतून त्यांस दिला जात होता, कोणाच्याहि अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नांतून दिला जात नव्हता" असा हायकोर्टानें निवाडा केला, व अलावन्सवर प्रांतावरील कर बसविणें योग्य आहे असें ठरविलें.

# स्फुट विचार

### मुंबई प्रांतिक सहकारी परिषद

मुंबई प्रांतांत सहकारी परिषद् अलीकडे कित्येक वर्षे भरलेली नाहीं. ह्या अवधींत कित्येक महत्त्वाचे प्रश्न सहकारी संस्थांपुढें उभे राहिले आहेत आणि युद्धजन्य परिस्थितीमुळें ते सोडवले जाण्याचें अगत्य वाढलें आहे. ह्या दृष्टीनें पहातां प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें नोव्हेंबर महिन्याच्या ११ व १२ ह्या तारखांस मुंबई येथें सहकारी परिषद् भरण्याचें ठरलें आहे हें समाधानकारक आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान सर टी. विजयराघवाचार्य मंडित करतील आणि मुंबईच्या गव्हर्नरांच्या हस्तें तिचें उद्घाटन होईल. परिषदेंत चर्चेसाठी येणाऱ्या विषयांची एक यादी सुचवण्यांत आली आहे. तीमध्यें शेतजमीनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, सहकारी पद्धतीची शेती, जमीन गहाणांच्या बँकांचें भवितव्य, डिस्ट्रिक्ट युनियन बोर्डांची सांपत्तिक स्थिति आणि त्यांचा युनिअन्स, बँक्स, सरकार व इन्स्टिट्यूटशीं परस्पर संबंध, मर्यादित जबाबदारीच्या शेती पतपेढ्यांची संघटना, मध्यवर्ती दुकानदारीच्या सोसायट्या, दुभाळ जनावरें व दूधविक्री ह्यांसाठीं संस्था, सहकारी विम्याचा विस्तार, खेडेगावीं धंदे स्थापण्यासाठी मध्यवर्ती संस्था, सहकारी कायद्यांत फेरफार, ह्या बाबींचा अंतर्भाव झालेला आहे. त्यांमध्यें कित्येक दुसऱ्या महत्त्वाच्या विषयांची भर घालतां येईल आणि ती घातली जाणें आवश्यक आहे. मल्टिपर्पज सोसायटीज, शेतकरी ऋणमुक्ततेच्या कायद्याची अंमलबजावणी, सहकारी शिक्षणाची योग्य तरतूद ह्या विषयींची चर्चा झाली पाहिजे. तसेंच, युद्धोत्तर कालांतील सहकारी पुनर्घटनेचा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे आणि त्यांत प्रत्यक्ष इन्स्टिट्यूटच्या भवितव्याचा अंतर्भाव होणें अगत्याचें आहे. इन्स्टिट्यूटची सध्याची घटना व तिचें कार्यक्षेत्र हीं समाधानकारक आहेत असें कोणीच म्हणणार नाहीं. तेव्हां त्याच्या पुनर्घटनेचा विचार होऊन तिच्या संबंधांत सुधारणेची योजना परिषदेनें सुचवणें युक्त आणि इष्ट आहे. ह्या व इतर येणाऱ्या सूचनांचा योग्य परामर्ष घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

---

### सहकारी स्वरूपाचा ब्रिटिश नाट्यसंघ

मराठी रंगभूमीचा इतिहास, तिची सद्यःस्थिती आणि तिचें भवितव्य ह्यासंबंधांत अलीकडे वर्तमानपत्रांत, नियत कालिकांत, परिषदांत, सभांत व भाषण–व्याख्यानांत चर्चा चालली आहे. ह्या रंगभूमीशी चित्रपटांची स्पर्धा, तिच्या अवनतीचीं कारणें आणि नाटकें लोकप्रिय करण्यास उपाय ह्या प्रश्नांवर विचार प्रदर्शित केले जात आहेत. नाटक मंडळ्यांची घटना, त्यांची व्यवहार-पद्धति, नट-नटींचा पेशा, प्रेक्षकांची आवड-नावड, इत्यादि बाबींचा खलहि त्यांत होत आहे. मराठी रंगभूमीचें लोकशिक्षणाचें व मनोरंजनाचें कार्य वाढत्या प्रमाणांत यशस्वी होण्याचें महत्व सर्वांस पटलें असून त्या मार्गानें आस्थावाइक व कलाप्रेमी लोक यत्नहि करीत आहेत. अशा वेळीं नाट्यकलेचें लोण सामान्य जनतेपर्यंत पोंचवावयाचें, उत्कृष्ट संस्कृतीचा प्रसार बहुजन समाजांत लोकशाही पद्धतीनें करावयाचा आणि त्या घटनेंत भांडवलशाही किंवा व्यक्तिसत्ता ह्यांचा शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं ह्या हेतूनें इंग्लंडमध्यें एक उपक्रम करण्यांत आला आहे, त्या विषयीची माहिती मराठी रंगभूमीच्या पुरस्कर्त्यांस विचार प्रवर्तक होईल ह्यांत शंका नाहीं.

---

### " पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी "

" पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी " ह्या नांवाची संस्था त्या देशांत स्थापन झाली आहे. जनमनरंजनाची व्यवस्था नाट्य-प्रयोग, संगीताचे जलसे इत्यादि मार्गांनीं करण्याचें सामर्थ्य अंगीं असलेला संघ बनवणें आणि प्रत्येक लहानमोठ्या शहरांत नाट्य-प्रेमी लोक एकत्र आणून त्यांचे सहायानें हें कार्य करणें हे तिचे मुख्य उद्देश आहेत. तिचे मूळचे सभासद, सहकारी सोसायट्या आणि नाट्यकलेचें जीवन केवळ तिकीट विक्रीच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवणें अनिष्ट आहे ह्या मताच्या ध्येयवादी व्यक्ती हे होत. ह्या सोसायटीचें सर्व भांडवल तिच्या सभासदांनीं तिच्या भागांत घातलेल्या पैशानें निर्माण झालें आहे. एकपासून दोनशें पौंडांपर्यंत प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणें सभासदांस भाग विकत घेतां येतात. इंडस्ट्रिअल ॲन्ड प्रॉव्हिडंड सोसायटीज ॲक्ट ह्या कायद्याखालीं सोसायटी नोंदलेली आहे आणि त्यानेंच भाग धारणाच्या मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. भागांच्या पैशावर तीन टक्के ह्या दरानें व्याज सभासदांस दिलें जातें आणि सर्व खर्च भागून निवळ शिल्लक उरते तिच्यामधून पाहिलेल्या नाट्यप्रयोगांच्या प्रमाणांत तिकिटांच्या किंमतीवर रिबेट दिलें जातें. मालविक्रीचे सहकारी संघ किंवा स्टोअर्स ह्याच पद्धतीनें चालतात. ते आपल्या सभासदांस त्यांस हवा असलेला माल पुरवतात. प्रस्तुत नाट्यसंघ आपल्या सभासदांस मनोरंजन देतो आणि त्यांचेकडून मिळालेल्या तिकिटांच्या पैशामधून निवळ नफा उरेल त्यांतून रिबेट देतो. संघाचा कारभार सहकारी संस्थांच्या लोकशाही पद्धतीनें चालतो. हजारो लोक ह्या पद्धतीनें स्वतःच्या करमणुकीसाठी खेळ, जलसे इत्यादींची व्यवस्था आपल्या प्रतिनिधींचे मार्फत करतात हें त्याचें वैशिष्ट्य आहे. जनतेच्या जीवनास लागणाऱ्या अनेक वस्तूंपैकीं मनोरंजन ही एक मोठ आहे आणि चांगल्या प्रतीचा व बेताच्या किंमतीचा हा माल आपणांस मिळत जावा अशी तरतूद अनेक व्यक्ती संघटनेनें करतात. ही सहकारी व्यवस्था येथें अंमलांत आणली गेली आहे. धंदेवाइक नाटक मंडळ्यांच्या सहायानें ठिकठिकाणीं सोसायटी खेळ करवीत आहे. होशी नटनटींच्या मंडळांकडूनहि प्रयोग केले जात आहेत.

---

### श्री. गुरुनाथराव ( नानुकाका ) ओगले ह्यांचें शोचनीय निधन

सुप्रसिद्ध काचकारखानदार ओगले बंधूंपैकीं एक कर्तबगार भागीदार श्री. गुरुनाथराव ओगले ता. १५ ऑक्टोबर रोजीं तळेगांवाहून मळवाईस जात असतां आगगाडींत अकस्मिकपणें प्राण पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं कारखान्याचा विस्तार केला. कंदील करण्याचा कारखाना काढण्यांत त्यांनींच पुढाकार घेतला. त्यांनीं परदेशांत प्रवास करून अनुभव मिळविला, त्याचा पुरेपूर फायदा महाराष्ट्रास व हिंदुस्थानास दिला. कंपनीच्या आपत्काळांतून तिचा आजचा झालेला विस्तार त्यांनींच मुख्यतः घडवून आणला. मृत्युसमयीं त्यांचें वय ५५ वर्षांचें होतें. त्यांच्या मृत्युमुळें ओगले बंधूंचें व महाराष्ट्राचें झालेलें नुकसान लवकर भरून येण्यासारखें नाहीं.

## भिवंडी कल्याण तालुका को. सुपरवायझिंग युनिअन

या युनिअनची वार्षिक जनरल सभा ता. ११-९-४४ रोजीं भिवंडी येथें श्री. शिवराम कृष्णाजी पाटील, युनिअनचे चेअरमन, यांचे अध्यक्षतेसाठीं भरली होती.

युनिअनचें कार्यक्षेत्र भिवंडी कल्याण, शहापूर, मुरबाड व साष्टी तालुक्यापुरतें असून एकूण ६७ संस्था या युनिअनला सामील झाल्या आहेत. युनिअनचे कार्यक्षेत्रांत शहापूर तालुक्यास कर्जनिवारण कायदा लागू झाला असून त्या बोर्डाचें कामकाजहि सुरू झालें आहे.

युनिअनचे कार्यक्षेत्रांत भिवंडी, मुरबाड व साष्टी तालुक्यास खरेदी-विक्री युनिअन्स स्थापन झालें असून तालुक्यांतील सर्व भागांत अन्नधान्य वाटपाची पद्धत या युनिअन्सनी आपले सेंटर्स काढून उत्तम रीतीनें चालविली आहेत. तसेंच बेलापूर विविध कार्यकारी सोसायटी व बदलापूर कंझुमर्स या सोसायट्यांनीं आपल्या भागांत पुरवठा करण्याची जबाबदारी घेतली असून वाटप पद्धत खेड्यांतील जनतेस चांगल्या प्रकारें करण्याचें श्रेय या संस्था मिळवून जनतेंत आपला विश्वास निर्माण करीत आहेत. युनीयनचें खेळतें भांडवल १½ लक्ष रुपयांवर आहे.

### ग्रेन डेपोंची प्रगति

भातकोठार व पालेमोडी कर्जाबाबत मागें (२९-१२-४३) अर्थांत उल्लेख केलेलाच होता. त्या दृष्टीनेंही ग्रेन डेपोजमध्यें दिवसेंदिवस प्रगती दिसून येत आहे. एकूण ३७ ग्रेन डेपोज सुरू असून त्यांची सांपत्तिक परिस्थिति खालीप्रमाणें आहे.

(१) भाताचें येणें कर्ज ३९४८ मण (२) शेअर्स १३११ मण (३) रिझर्व्ह फंड १०३ मण (४) बॅंकेकडून खरेदी १४६७ मण (५) भाताचा नफा १०४८ मण (६) भात रूपानें असलेल्या कर्जाची किंमत २५०७१ रुपये.

नवीन ग्रेन डेपोजही काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत व ते यशस्वी होत आहेत. सहकारी चळवळींतील सभासदांस चळवळीचा अभ्यास व माहिती होण्यास सहकारी वाङ्मयाची जरूरी असलेमुळें जनरल मीटिंगचे दिवशीं अशी लायब्ररी (फिरतें वाचनालय ठेवण्याचें) काढण्याचें ठरून सभेंत कांहीं उदार गृहस्थांकडून व अधिकाऱ्यांकडून देणग्याही मिळाल्या व अशा चांगल्या कार्यास बॅंकेनेंही उदार अंतःकरणानें हातभार लावला आहे.

### दुधाचें रेशनिंग सुरू होणार!

दिल्ली व इतर मोठीं हिंदी शहरें ह्यांत कोणत्या तरी स्वरूपांत दुधाचें रेशनिंग लवकरच सुरू करण्यांत येईल, असें प्रसिद्ध झालें आहे. युद्धापूर्वी, हिंदुस्थानांतील माणशीं दुधाचा खप वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळा होता. कटक येथें तो दर आठवड्यास माणशीं २½ औंस होता, तर शिकारपूर येथें तो ५९ औंस होता. आतां लोकांना पूर्वी इतकें दूध मिळत नाहीं. तेव्हां त्याची जास्त गरज आहे अशांना तें उपलब्ध करून द्यावें, असा सरकारचा हेतु आहे. इंग्लंड व स्वित्झरलंड हे देश वगळून बाकीच्या कोणत्याहि युरोपिअन देशांत लहान मुलांखेरीज इतरांना दूध मिळत नाहीं. लहान मुलांना तें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत मिळावें अशी योजना असते. तीन वर्षांपर्यंतच्या मुलांना जर्मनींत दर आठवड्यास १८४ औंस दूध मिळतें. इंग्लंडमधील मुलांना १४० औंस मिळूं शकतें. बेल्जम, फ्रान्स, नेदरलंडस, नॉर्वे, स्वित्झरलंड येथील मुलांसहि १८४ औंस दूध मिळूं शकतें. इटलींत मात्र ७ औंसांवरच त्यांस भागवावें लागतें.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ

श्री. व्ही. डी. कारखानीस, असिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, पुणें. आणि श्री. डी. डी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंक, लि. ह्यांच्या सह्यांवर खालील विनंतिपत्रक काढण्यांत आलें होतें.

"पुणें जिल्ह्यांतील ग्रामीण व नागरी जनतेच्या हिताच्या दृष्टीनें आपल्या जिल्ह्यांत एक जिल्हा सहकारी खरेदी व विक्री संघ स्थापन करणें जरूरीचें दिसतें. विशेषतः शेतकरी ऋण विमोचन कायद्याची जों जों अधिक तालुक्यांतून अम्मलबजावणी सुरू होईल तों तों तेथील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें अशा संस्थेची तर फारच जरूरी भासूं लागेल. तसेंच ग्रामीण जनतेच्या दृष्टीनें दैनंदिन गरजेसाठी लागणारा भुसार, किराणा, कापड इत्यादि माल योग्य त्या ठिकाणाहून खरेदी करून आणून तो त्यांना त्यांच्या सहकारी पुरवठा मंडळ्यांमार्फत पुरविण्याच्या दृष्टीनेंही अशा संस्थेचा विशेष उपयोग होईल असें वाटतें. तरी अशी एक सहकारी संस्था पुणें जिल्ह्यासाठी स्थापन करावी किंवा कसें, तसेंच ती स्थापन करण्याचें ठरल्यास तिचें भांडवल किती असावें, तिची घटना कोणत्या स्वरूपाची असावी, वगैरे बाबत विचार करण्यासाठीं पुणें जिल्ह्यांतील कांहीं प्रमुख सहकारी बंधु-भगिनींची प्राथमिक सभा सोमवार तारीख २३ आक्टोबर १९४४ रोजीं दुपारीं ४ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंकेच्या दिवाणखान्यांत भरविण्याचें आम्हीं ठरविलें आहे.

वरील पत्रकास अनुसरून प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नियोजित सभा भरली आणि तीमध्यें पुणें जिल्ह्यांसाठीं खरेदी विक्री संघ स्थापन करण्याचें ठरलें.

### जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि., भिवंडी

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर सुमारें १६००० रु. घसारा व बोनससाठीं बाजूस काढून संपलेल्या वर्षी ६२,९४९ रुपये निव्वळ नफा झाला. त्यांतून गुडविलच्या १४,००० रुपयांपैकीं १३,९९९ रुपये लिहून टाकण्यांत आले. ऑर्डिनरी भागांस ६%+२% डिव्हिडंड मिळालें. पुढील वर्षाच्या हिशेबांत ४०,९१८ रु.नफा ओढण्यांत आला. १९४२-४३ मध्यें कंपनीच्या नफ्याची रकम ३०½ हजार रुपये होती. कंपनीजवळ तरता पैसा बराच शिल्लक दिसतो, कारण तिनें सुमारें ४½ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले आहेत. ठेवींचा आंकडा १ लक्ष, ३६ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें सुमारें ५ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली व वर्ष अखेरीच्या शिल्लक मालाची किंमत १ लक्ष, २७ हजार रुपये आहे. कंपनीची सालोसाल प्रगति होत असून तिच्या नफ्याचा आकडा व डिव्हिडंडचें प्रमाण वाढत आहे. कंपनीच्या वसूल भांडवलाचा आकडा ५ लक्ष रुपये आहे. त्या कारणानें युद्धोत्तर परिस्थितींतहि कंपनीस अडचण येणार नाहीं. मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे व तिचे प्रमुख कंपनीचे उत्पादक श्री. गोपाळ गणेश दांडेकर हे आहेत.

## बँकांच्या शाखांमधील रोख पैशाची सुरक्षितता

( ले: एका बँकेच्या शाखेंतील नोकर )

बँकांकडील ठेवींमध्यें बेसुमार वाढ झाल्यामुळें आपला पैसा गुंतविण्यासाठी बँकांनीं निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या ठिकाणीं आपल्या शाखा काढण्याचा उपक्रम जोरांत सुरू केलेला दिसतो. परंतु शाखांमध्यें असलेल्या पैशाच्या सुरक्षिततेबद्दल अलीकडे वारंवार ऐकू येणाऱ्या लुटालुटीच्या बातम्यांवरून शंका येण्यास जागा आहे. काशीपासून रामेश्वरपर्यंत काठीला सोनें बांधून नेलें तरी हिंदुस्थानांत चोरी होत नसें असें म्हणतात, परंतु त्या मनोवृत्तीचा हिंदुस्थान आतां राहिला नाहीं. सरकार व बँकेचा अधिकारी वर्ग झालेल्या प्रकाराबद्दल योग्य ती दक्षता घेईलच. परंतु शाखांमध्यें काम करीत असलेल्या नोकरवर्गावर सद्यःपरिस्थितींत किती जबाबदारी पडते व त्या दृष्टीनें शाखांची परिस्थिति काय आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे.

कित्येक शाखांमध्यें एकच मनुष्य काम करीत असतो व अशा लुटालुटीचे प्रकार हे इतक्या झटपट रीतीनें उरकले जातात कीं त्याची कल्पना सुद्धा कोणाला लवकर येत नाहीं. भोवतालचे लोक सुद्धा ऐनवेळीं मदतीसाठी पुढें येतातच असें नाहीं. किंबहुना अशावेळीं बरेचसे लोक स्वतःच्या जिवाच्या भीतीनें शक्यतों दूर राहण्याचा प्रयत्न करतात. बँकेंत काम करणाऱ्या इसमाजवळ प्रतिकाराचें साधन नसतेंच. असा प्रकार झाल्यानंतर त्या नोकराच्या बचावाकडे लक्ष दिलें जातेंच असेंही नाहीं. संकटांत सापडलेल्या नोकराच्या मनोवृत्तींत व चौकशी करावयास आलेल्या अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तींत त्यावेळीं तरी जमीन अस्मानाचें अंतर असतें. याशिवाय आपणांवरील जबाबदारी शक्य तों दुसऱ्यावर टाकून एखाद्या प्रसंगांतून आपण निभावून जाण्याच्या मनुष्याच्या सहज मनोवृत्तीस अपवाद असतोच असेंही नाहीं.

स्थानिक परिस्थित्यनुरूप पैशाच्या ने-आण करण्याच्या व्यवस्थेसंबंधीं व पैसा हाताळण्यासंबंधीं निश्चित असे नियम बँकांनीं केलेले नसतात व अशा प्रसंगीं या संबंधींच्या नियमांची उणीव व जरूरी स्पष्ट भासते. ज्या त्या गांवापुरतें अशा तऱ्हेचें नियम बँकांनीं नोकर वर्गास घालून दिल्यास त्या नियमांची अम्मलबजावणी कसोशीनें करणें एवढीच जबाबदारी त्या नोकर वर्गावर पडेल व आपल्या कामाची व जबाबदारीची निश्चित दिशा त्यांस ठरवितां येईल.

याशिवाय, कॅशिअरला दिलेला कौंटर शक्य तो बंदिस्त असावा व काम चालू असतां त्याला तो बंद करून घेतां यावा रोजचा शिलकी पैसा बँकेच्या ऑफिसांतच बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था असावी व व्यवहार चालू असतानां लोकांना बँकेंतील पैसा शक्यतों दिसणार नाहीं अशा रीतीने ठेवला जावा. कॅशिअरला आपल्या व पैशाच्या बचावासाठी हत्यार वापरण्याची परवानगी मिळवून द्यावी. या योगानें संकटाच्या वेळीं प्रसंगावधान राखून स्वतःचा बचाव करण्याची संधी तरी त्याला मिळवून दिल्यासारखें होईल. बँकेच्या शिपायांना पैशाच्या बाबतींत हात घालण्यास शक्यतों कमी संधी दिली जावी. या योगानें बँकेच्या व्यवहारातील गुप्तपणा राखण्यास मदतच होईल.

नोकरवर्गाच्या व पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें पैशाशीं संबंध येणारा सर्व नोकरवर्ग वेळोवेळीं बदलला असतां जास्त फायदेशीर होईल. याशिवाय बँकेच्या शिलकी पैशाचा व नोकरवर्गाच्या जीविताचा विमा उतरल्यानें धोक्यापासून वाटणारी भीति अंशतः कमी होण्यास मदत होईल.

## सहकारी खरेदी–विक्रीचें महत्त्व

### माळशिरस ता. ख. वि. सहकारी संस्थेची अकलूज येथें शाखा

ता. ४-१०-४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां अकलूज येथें माळशिरस तालुका खरेदी विक्री सहकारी संस्थेची शाखा उघडण्यांत आली. सभेस अध्यक्ष मुंबई प्रां. ब्यांकेचे लोकप्रिय मॅ. डायरेक्टर सो श्रीयुत व्ही. एल. मेथा हे अध्यक्ष होते. आरंभीं स्वागताध्यक्ष श्री. मा. तु. कुलकर्णी यांनीं सेल सोसायटीची प्रगति कशी होत गेली हें सांगून ही संस्था स्थापन झालेपासून ८ वर्षे 'अ' वर्गांत आहे हें नमूद केलें आणि संस्थेनें गेल्या दोन वर्षांत शेतकऱ्यांचा सुमारें रु. १५ लाख वा ५५ हजार खंडी माल विकणेंत आला, हें विशद करून नियोजित अध्यक्ष यांची सभेतील लोकांना ओळख करून दिली आणि आपलें भाषण संपविलें. त्यानंतर मि. अवचट सुपरवायझर यांनीं सभेस आलेले निरनिराळ्या अधिकारी लोकांचे संदेश वाचून दाखविले. त्यानंतर अध्यक्ष, श्री. मेहता यांचें भाषण झालें. ते म्हणाले, " माळशिरस तालुक्यात सहकारी चळवळ श्रीयुत मारुतराव कुलकर्णी, युनियन प्रेसिडेंट, यांचे नेतृत्वाखालीं फोफावत आहे याबद्दलची खातरी आजच्या या समारंभावरून दिसून येते. सहकारी संघटनेमार्फत शेतकरी आपल्या मालाचा क्रम-विक्रय करितात याची महती त्यांना पटल्यामुळें आज आपणांस अकलूज शाखा उघडण्याचा प्रसंग आला आहे. आपणांस प्रत्येक व्यापारी पेठेंत सहकारी खरेदी-विक्रीच्या शाखा उघडण्याचा योग येईल अशी मला उमेद आहे. आपल्या तालुक्यांत सहकारी क्रय–विक्रय मंडळानें केलेली कामगिरी हल्लींच्या कंट्रोलचा विचार करितां खरोखर प्रशंसनीय आहे."

यानंतर श्री. पाळेकर, आसि. रजिस्ट्रार, यांनीं "सहकारी चळवळ खेडेगांवांत वाढत गेल्यास शेतकऱ्यांना आपली सर्वांगीण उन्नती आणि स्वावलंबन हीं लवकर साध्य होण्यासारखीं आहेत. हा कालव्याचा भाग असलेमुळें येथील शेतकरी इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांचे मानानें सधन आहेत आणि त्यांनीं ही चळवळ हातीं घेतली तर आपला तालुका एक सहकारी चळवळीचे आदर्शभूत केंद्र बनेल " अशी आशा व्यक्त केली.

यानंतर मे. मामलेदारसाहेब यांनीं भाषण केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत शेतकऱ्यांची खरी उन्नति होण्यास सहकारी संघटना हाच एक मार्ग आहे आणि या संघटनेमार्फत वागल्यास शेतकऱ्यांची खात्रीनें सुधारणा होईल, परंतु ही संघटना लोकांचे अंगीं येणेस शिक्षणाची आवश्यकता आहे असें सांगितलें. त्यानंतर श्री. नवलेबुवा यांनीं "सर्वांनीं एकजुटीनें प्रयत्न करून ही खरेदी–विक्री संस्था वाढविली याचें श्रेय श्री. नानासाहेब कुलकर्णी यांना आहे आणि त्यांचेच निश्चयामुळें आम्हीं सर्व एक झालों " असें सांगितलें. यानंतर मे. हर्डीकर यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं थोड्या पावसांत उत्पादक शेती कशी करावी याची माहिती सर्व लोकांस पटेल अशी सांगितली. त्यानंतर श्रीयुत बेद्रकर यांनीं शिंदेवाडी गांवांत सहकारी संघटनेमार्फत झालेली प्रगती सांगून लोकांच्या उन्नतीस हाच एक मार्ग आहे हें सांगितलें. यानंतर श्रीयुत दाते यांनीं खरेदी विक्री संस्थेचें महत्व लोकांना पटलें हें आजच्या समारंभाचे द्योतक आहे आणि अशी संघटना केल्यास बँकिंग युनियन सुद्धां आपले तालुक्यांत होईल असें भाषण केलें.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें.

### सहकार सप्ताह, १९४४.

#### पुणें शहरांतील कार्यक्रम

स्थळ:—बँकेचा दिवाणखाना वेळ:—सायंकाळीं ७ वाजतां

| तारीख | वार | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| २९।१०।४४ | रविवार | | सप्ताहाचें उद्घाटन. |
| ३०।१०।४४ | सोमवार | सौ. इंदिराबाई देवधर. | स्त्रिया व सहकारी चळवळ (५॥ ते ६॥) |
| ३१।१०।४४ | मंगळ. | श्री. भीमराव जोशी | सहकारी सोसायट्यांच्या निवडणुकी |
| | | प्रो. एस. व्ही. कोगेकर. | मुंबई सरकारची १५ वर्षांची योजना. |
| १।११।४४ | बुधवार | श्री. दा. वा. पोतदार. | नागरी सहकारी चळवळ. |
| २।११।४४ | गुरुवार | श्री. य. धों. ओगले. | गृहमंडळ्यांचा कारभार |
| ३।११।४४ | शुक्रवार | प्रो. शं. रा. भागवत. | सहकारी कन्झुमर्स चळवळ. |
| ४।११।४४ | शनिवार | प्रो. ध. रा. गाडगीळ. | समारोप. |

#### जिल्ह्यांतील कार्यक्रम

| तारीख | वार | स्थळ | प्रमुख वक्ते |
|---|---|---|---|
| २९।१०।४४ | रविवार | सासवड, ता. पुरंदर. | श्री. य. धों. ओगळे |
| २९।१०।४४ | रविवार | मंचर पेटा आंबेगांव. | श्री. ग. र. तुळशीबागवाले. |
| २९।१०।४४ | रविवार | जुन्नर, तालुका जुन्नर | श्री. दा. ग. बापट. |
| ३०।१०।४४ | सोमवार | तळेगांव | श्री. य. धों. ओगले |
| २।११।४४ | गुरुवार | कुरकूंम, ता. दौन्ड | श्री. मो. ना. पाटसकर |
| ३।११।३४ | शुक्रवार | उंटवडी कडेपठार ता. भिमथडी | श्री. मुगुटराव सा. काकडे |

### बेळगांव डि. सें. को. बँक लि.

ह्या बँकेची वार्षिक साधारण सभा बँकेचे चेअरमन श्री. उगरगोळ वकील यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार ता. २४।१०।४४ रोजीं झाली. अहवालाच्या सालीं बँकेला एकूण नफा ४७१३१–१४–० झाला. भागीदारांना ५ टक्के नफा वाटण्यांत आला. यंदाच्या वर्षी बँकेचें शेअर भांडवल ८२,३५० रु. नीं वाढलें असून तें साल अखेर ३,११,९०० रु. झालेलें आहे. बँकेनें मॅनेजिंग डायरेक्टरची एक नवीन जागा निर्मान केली आहे.

### दि बँक ऑफ सिटिझन्स, लि., बेळगांव

वरील बँकेनें १ ऑगस्ट १९४४ रोजीं ६,००० नवीन शेअर्स विक्रीस काढून त्यांपैकीं ४,००० शेअर्स जुन्या भागीदारांस व फक्त २,००० शेअर्स नव्या ग्राहकांना देण्यांत येतील, असें जाहीर केलें होतें. ह्या २,००० शेअर्सकरितां, शेअरमागें ५ रुपये प्रीमियम असूनहि, जवळ जवळ दुप्पट अर्ज आले, असें समजतें. जुन्या भागीदारांनीं शेअर्सकरितां अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर रोजीं संपली.


** **
# पूना गेस्ट हाऊस




टेलिफोन नं. ७७९

** **

## गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

# A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

## पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

**श्रीमंत कसें व्हावें?** संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देणें. वाचून लक्षाधीश व्हाल! किं. १॥ रु. **काम आणि कामिनी.** काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ! किं. १॥ रु. **मृत्युलोकचा प्रवास!** मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक! किं. १ रु. लिहा. विरट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील

## आदर्श निवासस्थान व भोजनालय

# छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. भास्कर वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.